## जिल्हा वार्षिक योजना

### क-वर्ग यात्रास्थळ विकास कार्यक्रम :-

**शासन निर्णय क्रतिर्थवि/२०११/प्रक्र.६५१/यो-७ दि.१६.११.२०१२नुसार योजनचेच्या मार्गदर्शक सुचना व त्या अनुषंगाने घेणेत येणारी कामे. :-**

### अ) पात्र होण्यासाठी अटी व शर्ती.

१. दि.१६.११.२०१२ चे शासन निर्णयानुसार सदर यात्रास्थळास वर्षभरात १ लाखापेक्षा जास्त भाविकांनी भेट दिल्या बाबतचा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा विहीत केलेल्या प्रमाणपत्रात भाविकांची उपस्थिती प्रमाणित करुन दिल्यास असे तिर्थक्षेत्र क वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळणे करीता पात्र ठरु शकतील.

२. विकसीत करावयाची जागा ग्रामपंचायत/देवस्थान ट्रस्ट यांच्या मालकीच्या जागेचा ७/१२ उतारा असणे आवश्यक

३. प्रस्तावित कामे अन्य कोणत्याही योजनेतून घेणेत आली नसले बाबत ग्रामपंचायत यांचे प्रमाणपत्र आवश्यक

४. सदरची जागा वनक्षेत्रात येत नसले बाबतचे वनविभागाचे प्रमाणपत्र.

### ब) योजनेंतर्गत घ्यावयाची कामे.

- **-मुख्य** रस्त्यापासूनचा यात्रास्थळापर्यतचा पे ाहोच रस्ता
- पोहोच रस्त्यावर पथ दिवे उभारणे.
- पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व नळाव्दारे पाणी पूरवठा करणे.
- तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढयाजवळ असेल तर संरक्षण भिंत बांधणे.
- शौचालय व स्नानगृह बांधणे.
- परीसरामध्ये झाडे लावणे व आवश्यक ठिकाणी पेव्हीं ग ब्लॉक बसविणे.
- वाहनांसाठी पेंव्हींग ब्लॉकसह वाहनतळ बांधणे.
- भक्त निवास बांधणे.

### उपलब्ध निधी

जास्तीत -जास्त एका आर्थिक वर्षात रु ३०.०० लाख पर्यत अनुदान मंजूर करता येते. .शासनाने मंजूर केलेला निधी योजनेंतर्गत सुविधा पुर्ण करणेस कमी पडल्यास ग्राम पंचायतीने स्वनिधीतून त्याची तरतूद करावी.

### देखभाल व दुरुस्ती :-

सदरच योजनांतर्गत निर्माण करणेत आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणेची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहिल. त्या करीता शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही.

कोल्हापूर जिल्हयात आज अखेर एकूण २८१ क वर्ग यात्रास्थळांना १ लाखा पेक्षा जास्त भाविक भेट देत असले बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहेत.

## जिल्हा वार्षिक योजना

### ग्राम पंचायतींना जनसुविधा पुरविणे :-

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग कडील शासन निर्णय ददभू/२०१०/प्रक्र-६२/पंरा-६ मंत्रालय मुंबई १६ सप्टेंबर २०१० व ३१.१०.२०१५

योजनेंतर्गत घ्यावयाची कामे.

**अ) ग्रामीण भागात दहन/दफन भूमीची व्यवस्था करणे व त्या सुस्थितीत ठेवणे व त्याचे नियमन करणे यासाठी स्मशानभूमीवर हाती घ्यावयाची कामे :-**

- **ग्रामीण भागात दहन /दफन भूमीसाठी जमीन संपादन करणे**
- **चबुत-याचे बांधकाम**
- **दहन/दफन भुमीकडे जाणारा पोहोच रस्ता तयार करणे.**
- **गरजे नुसार कुंपन व भिंत घालून जागेची सुरक्षितता साधणे.**
- **दहन/दफन भूमीत विद्युतीकरण व आवश्यकते नुसार विद्युत दाहीणीची /सुधारित शवदाहीणीची व्यवस्था करणे**
- **पाण्याची सोय, स्मृती उद्यान. स्मशानघाट/ नदीघाट बांधकाम जमीन सपाटीकरण व तळ फरशी बसविणे**
- **स्मशान शेड उभारणे तसेच निवारा शेड बांधणे व परिसर सुधारणा करणे.**

**ब)ग्राम पंचायत भवन /कार्यालय याबाबत हाती घ्यावयाची कामे :-**

- नविन ग्रा.प.इमारत बांधकाम व अंतर्गत सुविधा
- जुन्या ग्रा.प.ची दुरुस्ती किंवा विस्तार करणे
- ग्रा.प.आवारात वृक्षारोपन, परिसर सुधारणा व कंपौड वॉल बांधणे.

**सदर कामांची निवड जिल्हा नियोजन समिती मार्फत करणेत येईल**

### उपलब्ध निधी

जास्तीत -जास्त रु १०.०० लाख पर्यत अनुदान मंजूर करता येते.शासनाने मंजूर केलेला निधी योजनेंतर्गत सुविधा पुर्ण करणेस कमी पडल्यास ग्राम पंचायतीने स्वनिधीतून त्याची तरतूद करावी.

### देखभाल व दुरुस्ती :-

सदरच योजनांतर्गत निर्माण करणेत आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणेची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहिल. त्या करीता शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही.

# जिल्हा वार्षिक योजना

## ग्राम पंचायतींना नागरी सुविधा पुरविणे :-

### गावांची निवड :-

**१. दि.१.१.२०११ च्या जनगणने नुसार ५००० व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे सदर योजनेतून अनुदान मिळणे करीता पात्र होतात.**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग कडील शासन निर्णय क्रव्हीपीएम-२६१० /प्र.क्र.१२९ /प.रा४ दि.१६ सप्टेंबर २०१० व त्यास अनुसरुन , दिनांक २० आक्टोबर २०११ चे शुध्दीपत्रक , दि.२१ नोव्हेबर २०१२ चे शुध्दीपत्रक , दि.१५ मार्च २०१३ व १.०८.२०१६ नुसार खालील प्रमाणे

### योजनेंतर्गत घ्यावयाची कामे.

- गावाचा योजनाबध्द विकास करणे
- बाजारपेठांचा विकास
- सार्वजनिक दिवाबत्तीची सोय
- गावात बागबगीचे /उद्याने तयार करणे
- अभ्यासकेंद्र /वाचनालय/जेष्ठ नागरीकासाठी विरंगुळा केंद्र बांधणे
- ग्राम सचिवालय बांधणे/गावांतर्गत रस्ते करणे/छोटया ओब्यावर घाट बांधणे./साकव बांधणे.
- सांडपाणी व्यवस्थापनासाठी गावांतर्गत भूमीगत नाले बांधणे
- विकास कामाकरीता शासकीय जागा शिवाय इतर खाजगी जमिनी बाजार भावाने खरेदी करणे किंवा संपादित करणे करीता एकूण रकमेच्या ७५टक्के रक्कम परंतु रु २५.०० लाखा पर्यत उपलब्ध
- कामांची निवड ग्रामसभेद्वारे केली जाते.

### उपलब्ध निधी

एका वर्षात रु ५० लाख पर्यत व प्रकल्प काळात रु २.०० कोटी अनुदान मिळणेस पात्र आहेत. शासनाने मंजूर केलेला निधी योजनेंतर्गत सुविधा पुर्ण करणेस कमी पडल्यास ग्राम पंचायतीने स्वनिधीतून त्याची तरतूद करावी.

### देखभाल व दुरुस्ती :-

सदरच योजनांतर्गत निर्माण करणेत आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणेची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहिल. त्या करीता शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही.